माहिती हवीय?

संतोष हालकुडे, कुर्डूवाडी.

□ 'सूर ना सजे क्या गाऊं मैं...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील? गीतकार कोण?

— हे गाणे *बसंत बहार* या चित्रपटात होते, गीतकार शैलेंद्र.

सुमन लहू कोळी, वरेडी.

□ कोणकोणत्या क्रिकेटपटूंनी आतापर्यंत चित्रपटात भूमिका केलीय?

— सलिम दुर्रानी (*चरित्र*), सुनील गावसकर (*सावली प्रेमाची*, *मालामाल*), संदीप पाटील; सय्यद किरमानी (*कभी अजनबी थे*), कपिलदेव (*क्रिकेटर*), मोहसीन खान (*साथी*).

□ कोणता नायक निर्माता, दिग्दर्शक, लेखक, गायक व संगीतकार होता?

— किशोरकुमार.

□ १९७०पासून कोणकोणत्या नायकाचे पुत्र अभिनेते बनले?

— राज कपूरचे पुत्र रणधीर, ऋषी, राजीव, शशी कपूरचा मुलगा करण कपूर, धर्मेंद्रचे पुत्र सनी व बॉबी देओल, अरुणाचा मुलगा गोविंदा, राजकुमारचा मुलगा पुरू राजकुमार, राजेंद्रकुमारचा मुलगा कुमार गौरव, सुनील दत्तचा मुलगा संजय दत्त, विनोद खन्नाचा अक्षय खन्ना, मनोजकुमारचा मुलगा कुणाल गोस्वामी, देव आनंदचा मुलगा सुनील आनंद, राकेश रोशनचा मुलगा हृतिक रोशन, नासिर खानचा मुलगा अयुब खान, अमिताभचा मुलगा अभिषेक, जितेंद्रचा मुलगा तुषार कपूर, प्रेमनाथचा मुलगा प्रेमकिशन.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा-गोवा.

□ चित्रपट व्यवसायात आतापर्यंत कोणाकोणाला भारतरत्न पुरस्कार मिळालाय?

— सत्यजित रॉय व लता मंगेशकर यांना.

साहिल लहू कोळी, वरेडी.

□ 'आम्ही ठाकर ठाकर ह्या रानाची पाखरं...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील?

— *जैत रे जैत*.

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ सुनील दत्तने अजंठा आर्टस्‌तर्फे कोणकोणते चित्रपट निर्माण केले?

— *यह रास्ते है प्यार के*, *मुझे जीने दो*, *यादे*, *रेश्मा और शेरा*, *मनका मीत*, *नेहले पे देहला*, *दर्द का रिश्ता*, *यह आग कब बुझेगी*.

□ धर्मवीर संभाजी यांच्या चरित्रावर आजपर्यंत कोणकोणते मराठी चित्रपट निर्माण झाले आहेत?

— *छत्रपती संभाजी* (१९३४), *थोरातांची कमळा* (१९४१ व १९६३), *रायगडचा राजबंदी* (१९६५).

सुधा अ. कोर्टीकर, पंढरपूर.

□ *बरसात* व *किस्मत* या नावाचे किती चित्रपट आतापर्यंत निर्माण झाले आहेत? नायक-नायिका कोण?

— *बरसात* नावाचे दोन चित्रपट आतापर्यंत निर्माण झाले आहेत. १९४९ला पहिला *बरसात* आला होता. यात राज कपूर-नर्गिस व प्रेमनाथ-निम्मी या नायक-नायिकेच्या दोन जोड्या होत्या. १९९५ला दुसरा *बरसात* आला होता यात बॉबी देओल व ट्विंकल खन्ना नायक-नायिका होते. *किस्मत* या नावाचे सहा चित्रपट आतापर्यंत आले आहेत. १९१२ला आलेला पहिला *किस्मत* मूकपट होता. नायक नांद्रेकर-नायिका सुनीता. १९४३ दुसरा *किस्मत*, नायक-नायिका अशोककुमार-मुमताज शांती. १९५६ ला तिसरा *किस्मत*, नायक-नायिका रंजन-पीस कंवल. १९६८ ला चौथा *किस्मत*, नायक-नायिका विश्वजित-बबिता. १९८०ला पाचवा *किस्मत*, नायक-नायिका मिथुन चक्रवर्ती-रंजिता. १९९५ला सहावा *किस्मत*, नायक-नायिका गोविंदा-ममता कुलकर्णी.

मारुती गणपत कोळी, पेण.

□ कमल हसनचा पहिला गाजलेला हिंदी चित्रपट कोणता? नायिका कोण?



— चित्रपट: *एक दुजे के लिए*. नायिका: रती अग्निहोत्री.

□ कपूर घराण्यातील कोणकोणत्या कलाकारांनी बालकलाकार म्हणून भूमिका केलीय?

— राज कपूर (*इन्कलाब*), शशी कपूर (*आग*, *संग्राम*, *आवारा*, *अब दिल्ली दूर नही*), रणधीर कपूर (*श्री ४२०*), ऋषी कपूर (*श्री ४२०*, *मेरा नाम जोकर*), कुणाल कपूर (*सिद्धार्थ*) यांनी.

लहू पांडुरंग कोळी, वरेडी.

□ अशोक सराफ व रंजना या जोडीने कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

— *बाईलवेडा*, *हीच खरी दौलत*, *दैवत*, *गल्ली ते दिल्ली*, *गुपचुप गुपचुप*, *सासू वरचढ जावई*, *बहुरूपी*, *बिन कामाचा नवरा*, *कुलस्वामिनी अंबाबाई*, *खिचडी*.

सुधाकर परुळेकर, पुणे.

□ अभिनेत्री वनमाला यांचे खरे नाव काय?

— सुशीला पवार.

रविकांत साखरे, जामखेड.

□ फारुख शेख यांनी कोणकोणत्या नायिकांच्याबरोबर नायकाची भूमिका केली?

— पूनम धिल्लाँ (*नूरी*), दीप्ती नवल (*चश्मेबद्दूर*), रेखा (*उमराव जान*), स्मिता पाटील (*बाजार*), अनिता राज (*अब आयेगा मजा*), सुरिंदर कौर (*यहाँ वहाँ*), शबाना आजमी (*लोरी*), सलमा आगा (*सलमा*) या नायिकांच्याबरोबर.

एन. रामस्वामी, डोंबिवली (पूर्व).

□ रवी शंकरनी कोणकोणत्या चित्रपटांना संगीत दिलं?

— *धरती के लाल*, *अनुराधा*, *गोदान*, *मीरा*.

□ तलत महमूद यांचे शेवटचे गाणे कोणते? त्यांनी भूमिका केलेला शेवटचा चित्रपट कोणता?

— १९७१च्या *वो दिन याद करो* या चित्रपटातील 'मोहब्बत की कहानी यूं...' हे गाणे तलतचे शेवटचे गाणे. हे गाणे त्याने लता मंगेशकर यांच्याबरोबर गायले होते. *सोने की चिडियाँ* तलतने भूमिका केलेला शेवटचा चित्रपट.

□ मुकेशने हेमंतकुमारच्या संगीतात गाणे गायलेय का?

— *माँ बेटा*, *बीवी और मकान* व *उस रात के बाद* या तीन चित्रपटात मुकेश हेमंतकुमार यांच्या संगीतात गायलाय.

अशोक परशुराम परब, ठाणे (प.)

□ मुकेशनचे गायलेले शेवटचे चित्रपटगीत कोणते?

— *सत्यम शिवम सुंदर*मधील 'चंचल, शीतल, निर्मल, कोमल...'

अनिकेत मारुती कोळी, नवघर कोळीवाडा.

□ अमिताभ व गोविंदा यांनी कोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केलीय?

— *हम*, *बडे मिया छोटे मिया*.